# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव विभाग

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/ २०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १४/१०/२०२४ चे ठराव.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३६१** | **विषय क्रमांक- ४३६१**

**दिनांक – १४/१०/२०२४** | **विभाग- आरोग्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३६१ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आमुका/०४/कावि/२०८/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे कार्यक्षेत्रातील मनपाच्या शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळा इमारतीची/परिसराची तसेच स्वच्छतागृहाची यांत्रिककरणाव्दारे साफसफाई करणे कामकाजाबाबत. |
| **ठराव क्र.४३६१ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आमुका/०४/कावि/२०८/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनपाच्या शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळा तसेच शिक्षण विभाग व आकांक्षा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येणा-या १०२ प्राथमिक शाळा व माध्यमिक विभागाचे १८ माध्यमिक विद्यालय तसेच मनपाचे २ औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) यांचे इमारती, परिसराची तसेच इमारतीमधील स्वच्छतागृहांची यांत्रिकीकरणाव्दारे साफसफाई करणे कामकाज करणेकामी निविदा नोटीस क्र.९/२०२३-२४ प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर निविदेमध्ये मे.ब्रिक्स इंडिया प्रा.लि L-1 निविदाधारक असून त्यांनी अंदाजपत्रकिय र.रु.६१,००,७९,६३४/- या रक्कमेवर ३.९५% जास्त म्हणजेच र.रु.६३,४१,७७,७८०/- इतक्या दराची निविदा सादर केलेली आहे. सबब मे.ब्रिक्स इंडिया प्रा.लि यांचे अंदाजपत्रकिय र.रु.६१,००,७९,६३४/- या रक्कमेवर ३.९५% जास्त म्हणजेच र.रु.६३,४१,७७,७८०/- इतका दर स्विकृत करणेस, याकामी त्यांच्याशी करारनामा करणे, कामाचा आदेश देणेस, तसेच सदरचा खर्च आरोग्य मुख्य कार्यालयाकडील "खाजगीकरणाव्दारे मनपा शाळा इमारतीची साफसफाई कामे करणे" या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच प्रत्यक्ष येणा-या खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३६२** | **विषय क्रमांक- ४३६२**

**दिनांक – १४/१०/२०२४** | **विभाग- वैद्यकीय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३६२ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.वैद्य/४अ/कावि/१४२/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे रुग्णालये/ दवाखाने यांना तातडीने आवश्यक असणा-या Non-Generic, Generic, Surgical Items, Opthopaedic Implant करीता स्थानिक एजन्सी / वितरक नेमणेबाबत. |
| **ठराव क्र.४३६२ दिनांक -** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.वैद्य/४अ/कावि/१४२/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विविध दवाखाने / रुग्णालयाकरीता तातडीने आवश्यक |

| | |
|---|---|
| १४/१०/२०२४ | असणारे Non-generic, Generic, Surgical Items व Orthopaedic Implant खरेदी करणेकामी ई- निविदा सुचना क्र. १/२०२४-२६ अंतीम करणेत आली आहे . सदर निविदेत एकुण ७ निविदाधारकांने सहभाग घेतला असुन त्यापैकी १) Non-Generic औषधाकरीता मे. केअर प्लस मेडीको यांनी MRP वर ६४.१२०% सुट २) Generic औषधाकरीता मे. मेडीनीली हेल्थकेअर प्रा.लि. यांनी MRP वर ९१.००% सुट ३) Surgical Items करीता मे. कोठारी मेडीकल यांनी MRP वर ७५.६० % सुट व ४) orthopaedic Implant करीता मे. मेडीनीली हेल्थकेअर प्रा.लि. यांनी MRP वर ६३.००% सुट देऊन निविदा लघुत्तम दर प्राप्त झाले असुन सदरचे दर २ वर्षाकरीता असुन प्राप्त लघुत्तम निविदाधारक व त्याचे लघुत्तम दरानुसार ४ कॅटेगरीसाठी एकुण र.रु.१२,००,००,०००/- + GST चे खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३६३** **विषय क्रमांक- ४३६३**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- पशुवैद्यकीय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३६३ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पवै/०२/कावि/२०१/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे हद्दीतील कार्यक्षेत्रातील जखमी / भटके श्वान व भटकी जनावरांबाबत तक्रारीचे निराकरण करणेकामी वाढीव मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेबाबत. |
| **ठराव क्र.४३६३ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पवै/०२/कावि/२०१/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे पशुवैद्यकीय विभाग अत्यावश्यक सेवेत येत असून विभागामार्फत म.न.पा. हद्दीतील कार्यक्षेत्रातील जखमी / भटके श्वान व भटकी जनावरांबाबत महापालिकेच्या सारथी हेल्पलाईन तसेच अन्य हेल्पलाईन वरुन प्राप्त होणा-या तक्रारीचे निराकरण करणेकामी अशासकीय संस्थेमार्फत दोन वर्ष कालावधी करीता मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे कामी ई-निविदा ०१/२०२३-२४ महाटेंडर वर प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदे मधील अटी व शर्ती व प्राप्त सेवा शुल्क विचारात घेऊन मे. साई एजन्सी ही संस्था र.रु.४,८५,६९,८५६/- इतक्या रकमेस पात्र झालेली आहे. सदर निविदेतील अटी व शर्ती नुसार संस्थेने आरोग्य निरिक्षक या पदावरील दोन कर्मचारी उपलब्ध करुन दिलेले आहेत. परंतू महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व क्षेत्रिय कार्यालय निहाय प्राप्त होणारे तक्रारी, मृत जनावरांच्या तक्रारी, जखमी / आजारी / उपद्रवी श्वान-जनावरांच्या तक्रारी, इ. विभागाशी संबंधित असणा-या तक्रारींचा विचार करता २ आरोग्य निरिक्षकाकडून काम करुन घेणेस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे प्राप्त होणा-या तक्रारींचा वेळेत निपटरा न झाल्याने नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे. तरी सदर संस्थेसमवेत करण्यात आलेला दि. ०७ ऑगस्ट २०२३ रोजीचा करारनाम्यातील अटी व शर्ती अधिन राहून तसेच मे.साई एजन्सी या संस्थेमार्फत अतिरीक्त आरोग्य निरिक्षक पदावरील २ कर्मचारी उपलब्ध करुन घेणेच्या व वाढीव खर्चाच्या प्रस्तावास तसेच सदरचा होणारा खर्च सन २०२४-२०२५ च्या मुळ अंदाजपत्रकातील बाह्यस्त्रोत पध्दतीने मनुष्यबळ पुरविणे या लेखाशिर्षकावरुन खर्ची टाकणेस व येणा-या वाढीव खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३६४** **विषय क्रमांक- ४३६४**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- माहिती व जनसंपर्क**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३६४ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/२९८/२०२४ दि.०८/१०/२०२४ अन्वये, मनपा अंदाजपत्रक प्रक्रीयेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणेबाबतच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.४३६४ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/२९८/२०२४ दि.०८/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंदाजपत्रक प्रक्रीयेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढवून मनपा कामकाजबाबत पारदर्शकता निर्माण व्हावी याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणेकामी प्रसिद्धीचे कामकाज करणेसाठी संस्थेची नियुक्ती करणेकामी मा.अतिरिक्त आयुक्त -३ सो यांची दि.३०/०७/२०२४ रोजीच्या प्रस्तावान्वये मान्यता घेऊन कोटेशन नोटीस मनपा संकेतस्थळवर प्रसिद्ध करून त्याद्वारे दरपत्रके मागविण्यात आलेली होती. त्यामध्ये M/s.Concept Communication, या संस्थेचा र.रु.९,५५,०००/- GST सह हा दर लघुत्तम प्राप्त झाला होता. त्यानुसार कामकाज आदेश क्र.माजसं/३/कावि/२४१/२०२४, दि. १४/०८/२०२४ अन्वये प्रसिद्धीचे कामकाज M/s.Concept Communication यांना सोपविण्यात आले होते. सदर कामकाजाचा कालावधीच्या दि.३१/०८/२०२४ पर्यत निश्चित करण्यात आलेला होता. तथापि सदर कामकाजाचा कालावधी दि.१० सप्टेंबर २०२४ पर्यंत वाढविण्यात आला होता. तरी याबाबतच्या वाढीव कामकाजासाठी र.रु.४,७५,०००/- + GST इतका खर्च M/s. Concept Communication या संस्थेमार्फत अधिक आकारण्यात आलेला आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंदाजपत्रक प्रक्रीयेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढवणेकामी एकूण = र.रु.१५,१५,५००/- GST सह इतका खर्च झाला असून याबाबतचे बिल M/s. Concept Communication यांना अदा करणेस व येणा-या खर्चास मा.प्रशासक यांची कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३६५** **विषय क्रमांक- ४३६५**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- स्थापत्य प्रकल्प**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३६५ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/२३९/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी ते निगडी महामेट्रो मार्गिका क्र.१ अ च्या कामास मनपा हिस्सा अदा करणेबाबत. |
| **ठराव क्र.४३६५ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/२३९/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, भारत सरकारच्या (GoI) मान्यतेनुसार, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड कडून पुणे मेट्रो फेज-१ च्या कॉरिडॉर-१ च्या विस्तारासाठी पीसीएमसी ते निगडी ४.४१३ किलोमीटर लांबीच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी र.रु.९१०.१८ कोटी रुपयांच्या पूर्ण खर्चासह मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी भारत सरकारने अनुदानाच्या स्वरूपात मदत दिली आहे, ज्याचा तपशील खालील दिलेल्या तक्त्यामध्ये दिला आहे. |

| Particulars | Amount (Rs. In Cr) | % Share |
|---|---|---|
| Grant by GoI | 67.02 | 10.0% |
| Grant by PCMC | 121.97 | 18.2% |

| | | |
|---|---|---|
| Grant by GoM | 79.08 | 11.8% |
| Soft Loan from bilateral / multilateral funding agencies | 402.11 | 60.0% |
| **Total** | **670.18** | **100%** |
| SD for state Taxes, Central taxes & Duties by GoM | 90.63 | - |
| Contribution By PCMC for Land, R&R, IDC, etc | 137.88 | - |
| **Total** | **898.68** | - |
| PPP Component | 11.5 | - |
| **Total** | **910.18** | - |

सद्यस्थितीत महामेट्रो मार्फत Geo Technical investigation चे काम जवळ जवळ पुर्ण करणेत आले असून लोकशाहिर अण्णा भाऊ साठे बस टर्मिनलच्या आवारामध्ये व खंडोबा माळ चौक येथे Foundation चे काम चालु करणेत आलेले आहे. तसेच महामेट्रोने सन २०२३-२४ साठी र.रु.८६.६१ कोटी इतकी मागणी केली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने मनपाच्या सन २०२४-२५ अंदाजपत्रकामध्ये पान क्र. ६३४ अ.क्र. १८ वर र.रु.५० कोटी इतकी तरतुद करणेत आलेली आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी केलेल्या मागणीनुसार महामेट्रोस उपलब्ध तरतुदीमधून र.रु. ४९.०० कोटी इतकी देणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३६६** **विषय क्रमांक- ४३६६**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- झोनिपु स्थापत्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३६६ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/१९३/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे झोनिपु विभागाकडील सक्षम प्राधिकारी यांना अधिकार प्रदान करणेबाबत. |
| **ठराव क्र.४३६६ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/१९३/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, सक्षम प्राधिकारी यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन स्थापत्य विभागातील झोपडपट्टीमधील स्वच्छ भारत अंतर्गत कामे, दैनंदिन देखभाल दुरुस्ती, स्थापत्य विषयक कामे करणे व सदरील कामे हे निविदा पध्दतीने करून निविदा विषयक कामकाज हे तातडीने/कालमर्यादीत स्वरुपात व विहीत मुदतीत होणेकामी र.रु.२५,००,०००/- कमाल मर्यादेपर्यंतच्या कामांना/खर्चाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे व संबंधित कामांसाठी निविदा मागवून अटी शर्ती निर्धारीत करून स्वाक्षरी करणे, करारनामा करणे, देयके अदा करणेकामी अधिकार प्रदान करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३६७** **विषय क्रमांक- ४३६७**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- आरोग्य मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३६७ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/२२६/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्मशानभूमीमधील दैनंदिन स्वच्छता, साफसफाई, देखरेख, सुरक्षा इ. कामाकरीता ठेकेदार पध्दतीने कामगार पुरविणेबाबत. |
| **ठराव क्र.४३६७ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/२२६/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्मशानभूमी मधील दैनंदिन स्वच्छता,साफसफाई,देखरेख,सुरक्षा इ. पध्दतीने कामगार पुरविणेबाबत निविदा नोटीस क्र.८/३/२०२३-२०२४ प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदांचे पहिले पाकीट दि.१६/०४/२०२४ रोजी उघडण्यात आले.सदर निविदेमध्ये ११ निविदाधारकांनी निविदा भरलेली होती. निविदाधारकांनी ऑनलाईन तसेच हार्डकॉपीद्वारे जमा करणेत आलेल्या कागदपत्रांची छाननी करुन ११ पैकी १० निविदाधारक पात्र ठरले होते त्यानुसार सदर निविदेचे दुसरे पाकिट दि.०४/०७/२०२४ रोजी उघडण्यात आले असून सदर निविदेमध्ये समान दर प्राप्त झाल्याने सोडत पध्दतीने नि.नो.क्र.८(१ते४) २०२३-२४ निविदाधारकांची दि.२६/०८/२०२४ रोजी दु.१२.३० वाजता सोडत करणेत आली होती.त्यानुसार पॅकेज क्र.३ साठी खालीलप्रमाणे संस्थेची चिठ्ठी निघालेली आहे.<br><br>अ क्र / तपशिल / स्मशानभूमी संख्या / L1 सोडतीमध्ये निघालेल्या संस्थांची नाव / निविदा र.रु. / स्विकृत रक्कम रु.<br>१ / ड क्षेत्रीय कार्यालय / ७ / मे.तावरे फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि. / ४,३६,३८,८७२/- / ४,४०,७५,२६१ (१% सेवाशुल्क)<br><br>सबब मे.तावरे फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि. यांचे अंदाजपत्रकीय र.रु.४,३६,३८,८७२/- या रक्कमेवर र.रु.४,४०,७५,२६१/- (१% सेवाशुल्क) दर स्विकृत करणेस, त्यांची पिंपळेनिलख स्मशानभुमी, वाकड गावठाण स्मशानभुमी, पिंपळे सौदागर स्मशानभुमी, कस्पटेवस्ती स्मशानभुमी, पिंपळेगुरव स्मशानभुमी, पुनावळे स्मशानभुमी, ताथवडे स्मशानभुमीत दैनंदिन स्वच्छता,साफसफाई,देखरेख,सुरक्षा इ.कामाकरीता ठेकेदार पध्दतीने काळजीवाहक,रखवालदार एका स्मशानभूमीसाठी ७ असे एकूण ४९ कामगार पुरविणे या कामासाठी ३ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणे,याकामी त्यांच्याशी करारनामा करणे, कामाचा आदेश देणेस, तसेच राज्य शासन निर्णयानुसार किमान वेतन दरामध्ये वाढ/घट केल्यास, त्यानुसार बिल अदा करणेस तसेच प्रत्यक्ष येणा-या वाढीव खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

Table within resolution:

| अ क्र | तपशिल | स्मशानभूमी संख्या | L1 सोडतीमध्ये निघालेल्या संस्थांची नाव | निविदा र.रु. | स्विकृत रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ड क्षेत्रीय कार्यालय | ७ | मे.तावरे फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि. | ४,३६,३८,८७२/- | ४,४०,७५,२६१ (१% सेवाशुल्क) |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३६८** **विषय क्रमांक- ४३६८**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- आरोग्य मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३६८ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/२२७/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्मशानभूमीमधील दैनंदिन स्वच्छता, साफसफाई, देखरेख, सुरक्षा इ. कामाकरीता ठेकेदार पध्दतीने कामगार पुरविणेबाबत. |

<table>
<tr>
<td>ठराव क्र.४३६८<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td>
<td>मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/२२७/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्मशानभूमी मधील दैनंदिन स्वच्छता,साफसफाई,देखरेख,सुरक्षा इ. पध्दतीने कामगार पुरविणेबाबत निविदा नोटीस क्र.८/२/२०२३-२०२४ प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदांचे पहिले पाकीट दि.१६/०४/२०२४ रोजी उघडण्यात आले.सदर निविदेमध्ये ८ निविदाधारकांनी निविदा भरलेली होती. निविदाधारकांनी ऑनलाईन तसेच हार्डकॉपीद्वारे जमा करणेत आलेल्या कागदपत्रांची छाननी करुन ८ पैकी ८ निविदाधारक पात्र ठरले होते त्यानुसार सदर निविदेचे दुसरे पाकिट दि.०४/०७/२०२४ रोजी उघडण्यात आले असून सदर निविदेमध्ये समान दर प्राप्त झाल्याने सोडत पध्दतीने नि.नो.क्र.८(१ते४) २०२३-२४ निविदाधारकांची दि.२६/०८/२०२४ रोजी दु.१२.३० वाजता सोडत करणेत आली होती.त्यानुसार पॅकेज क्र.२ साठी खालीलप्रमाणे संस्थेची चिठ्ठी निघालेली आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशिल</th><th>स्मशानभूमी संख्या</th><th>L1 सोडतीमध्ये निघालेल्या संस्थांची नाव</th><th>निविदा र.रु.</th><th>स्विकृत रक्कम रु.</th></tr>
<tr><td>१</td><td>क,ई क्षेत्रीय कार्यालय</td><td>७</td><td>मे.एमके फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि</td><td>४,३६,३८,८७२/-</td><td>४,४०,७५,२६१ (१% सेवाशुल्क)</td></tr>
</table>
सबब मे.एमके फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि यांचे अंदाजपत्रकीय र.रु.४,३६,३८,८७२/- या रक्कमेवर र.रु.४,४०,७५,२६१/- (१% सेवाशुल्क) दर स्विकृत करणेस, त्यांची नेहरुनगर स्मशानभुमी, मोशी स्मशानभुमी, डुडुळगाव स्मशानभुमी, भोसरी स्मशानभुमी, दिघी स्मशानभुमी, च-होली स्मशानभुमी, बोपखेल स्मशानभुमीत दैनंदिन स्वच्छता, साफसफाई, देखरेख, सुरक्षा इ.कामाकरीता ठेकेदार पध्दतीने काळजीवाहक, रखवालदार एका स्मशानभूमीसाठी ७ असे एकूण ४९ कामगार पुरविणे या कामासाठी ३ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणे, याकामी त्यांच्याशी करारनामा करणे,कामाचा आदेश देणेस, तसेच राज्य शासन निर्णयानुसार किमान वेतन दरामध्ये वाढ/घट केल्यास, त्यानुसार बिल अदा करणेस तसेच प्रत्यक्ष येणा-या वाढीव खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.</td>
</tr>
<tr>
<td>निर्णय:</td>
<td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td>
</tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३६९** **विषय क्रमांक- ४३६९**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- आरोग्य मुख्य**

<table>
<tr>
<td>विषय क्र.४३६९<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td>
<td>मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/२२८/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्मशानभूमीमधील दैनंदिन स्वच्छता, साफसफाई, देखरेख, सुरक्षा इ. कामाकरीता ठेकेदार पध्दतीने कामगार पुरविणेबाबत.</td>
</tr>
<tr>
<td>ठराव क्र.४३६९<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td>
<td>मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/२२८/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्मशानभूमी मधील दैनंदिन स्वच्छता,साफसफाई,देखरेख,सुरक्षा इ. पध्दतीने कामगार पुरविणेबाबत निविदा नोटीस क्र.८/१/२०२३-२०२४ प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदांचे पहिले</td>
</tr>
</table>

| | |
|---|---|
| | पाकीट दि.१६/०४/२०२४ रोजी उघडण्यात आले.सदर निविदेमध्ये १४ निविदाधारकांनी निविदा भरलेली होती. निविदाधारकांनी ऑनलाईन तसेच हार्डकॉपीद्वारे जमा करणेत आलेल्या कागदपत्रांची छाननी करुन १४ पैकी २ निविदाधारक पात्र ठरले होते त्यानुसार सदर निविदेचे दुसरे पाकिट दि.०४/०७/२०२४ रोजी उघडण्यात आले असून सदर निविदेमध्ये समान दर प्राप्त झाल्याने सोडत पध्दतीने नि.नो.क्र.८(१ते४) २०२३-२४ निविदाधारकांची दि.२६/०८/२०२४ रोजी दु.१२.३० वाजता सोडत करणेत आली होती.त्यानुसार पॅकेज क्र.१ साठी खालीलप्रमाणे संस्थेची चिठ्ठी निघालेली आहे. |

| अ. क्र. | तपशिल | स्मशानभूमी संख्या | L1 सोडतीमध्ये निघालेल्या संस्थांची नाव | निविदा र.रु. | स्विकृत रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ,बफ क्षेत्रीय कार्यालय | ९ | मे.जय भवानी एंटरप्रायजेस | ५,६१,०७,१२१/- | ५,६६,६८,१९२/- (१% सेवाशुल्क) |

| | |
|---|---|
| | सबब मे.जय भवानी एंटरप्रायजेस यांचे अंदाजपत्रकीय र.रु. ५,६१,०७,१२१/- या रक्कमेवर र.रु.५,६६,६८,१९२/- (१% सेवाशुल्क) दर स्विकृत करणेस, मोरवाडी स्मशानभुमी, चिंचवड लिंकरोड स्मशानभुमी, रावेत स्मशानभुमी, मामुर्डी स्मशानभुमी, काळेवाडी (नदीजवळील) स्मशानभुमी, किवळे स्मशानभुमी, तळवडे स्मशानभुमी, चिखली स्मशानभुमी, निगडी स्मशानभुमीत दैनंदिन स्वच्छता,साफसफाई,देखरेख,सुरक्षा इ.कामाकरीता ठेकेदार पध्दतीने काळजीवाहक,रखवालदार एका स्मशानभूमीसाठी ७ असे एकूण ६३ कामगार पुरविणे या कामासाठी ३ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणे,याकामी त्यांच्याशी करारनामा करणे,कामाचा आदेश देणेस,तसेच राज्य शासन निर्णयानुसार किमान वेतन दरामध्ये वाढ/घट केल्यास,त्यानुसार बिल अदा करणेस तसेच प्रत्यक्ष येणा-या वाढीव खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३७०** **विषय क्रमांक- ४३७०**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- आरोग्य मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३७० दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/२२९/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्मशानभूमीमधील दैनंदिन स्वच्छता, साफसफाई, देखरेख, सुरक्षा इ. कामाकरीता ठेकेदार पध्दतीने कामगार पुरविणेबाबत. |
| **ठराव क्र.४३७० दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/२२९/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्मशानभूमी मधील दैनंदिन स्वच्छता,साफसफाई,देखरेख,सुरक्षा इ. पध्दतीने कामगार पुरविणेबाबत निविदा नोटीस क्र.८/४/२०२३-२०२४ प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदांचे पहिले पाकीट दि.१६/०४/२०२४ रोजी उघडण्यात आले.सदर निविदेमध्ये १५ निविदाधारकांनी निविदा भरलेली होती. निविदाधारकांनी ऑनलाईन तसेच हार्डकॉपीद्वारे जमा करणेत आलेल्या कागदपत्रांची छाननी करुन १५ पैकी १२ निविदाधारक पात्र ठरले होते त्यानुसार सदर निविदेचे दुसरे पाकिट दि.०४/०७/२०२४ रोजी उघडण्यात आले असून सदर निविदेमध्ये समान दर प्राप्त |

| | |
|---|---|
| | झाल्याने सोडत पध्दतीने नि.नो.क्र.८(१ते४) २०२३-२४ निविदाधारकांची दि.२६/०८/२०२४ रोजी दु.१२.३० वाजता सोडत करणेत आली होती.त्यानुसार पॅकेज क्र.४ साठी खालीलप्रमाणे संस्थेची चिठ्ठी निघालेली आहे.<br><table><tr><th>अ. क्र.</th><th>तपशिल</th><th>स्मशानभूमी संख्या</th><th>L1 सोडती मध्ये निघालेल्या संस्थांची नाव</th><th>निविदा र.रु.</th><th>स्विकृत रक्कम रु.</th></tr><tr><td>१</td><td>ग,ह क्षेत्रीय कार्यालय</td><td>८</td><td>मे.सैनिक इंटेलिजैन्स एँन्ड सिक्युरिटी प्रा.लि.</td><td>४,९८,७२,९९६/-</td><td>५,०३,७१,७२६/- (१% सेवाशुल्क)</td></tr></table><br>सबब मे.सैनिक इंटेलिजैन्स एँन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचे अंदाजपत्रकीय र.रु.४,९८,७२,९९६/- या रक्कमेवर र.रु.५,०३,७१,७२६/- (१% सेवाशुल्क) दर स्विकृत करणेस, रहाटणी स्मशानभुमी, थेरगाव स्मशानभुमी,पिंपरीगाव स्मशानभुमी, पिंपरीनगर (काळेवाडी पुलाजवळ) स्मशानभुमी, फुगेवाडी स्मशानभुमी, कासारवाडी स्मशानभुमी, दापोडी स्मशानभुमी, सांगवी स्मशानभुमीत दैनंदिन स्वच्छता,साफसफाई,देखरेख,सुरक्षा इ. कामाकरीता ठेकेदार पध्दतीने काळजीवाहक,रखवालदार एका स्मशानभूमीसाठी ७ असे एकूण ५६ कामगार पुरविणे या कामासाठी ३ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणे,याकामी त्यांच्याशी करारनामा करणे,कामाचा आदेश देणेस,तसेच राज्य शासन निर्णयानुसार किमान वेतन दरामध्ये वाढ/घट केल्यास, त्यानुसार बिल अदा करणेस तसेच प्रत्यक्ष येणा-या वाढीव खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३७१** **विषय क्रमांक- ४३७१**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- स्थापत्य ह क्षेत्रीय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३७१ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/स्था/१०७३/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे प्रभाग क्र.२० संत तुकारामनगर येथील अग्निशामक केंद्राच्या इमारतीचे नुतनीकरण करणेचे सुधारित खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.४३७१ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/स्था/१०७३/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे अग्निशामक इमारतीची उर्वरित कामे करणेकरिता पुरेशी निविदा रक्कम शिल्लक राहत नसल्याचे निदर्शनास येत असल्याने उर्वरित प्रस्तावित कामे करणेकामी मुळ अंदाजपत्रकातील आवश्यक बाबींमध्ये वाढ होत असल्याने मुळ निविदा रक्कमेमध्ये र.रू.५०,५६,९३१/- इतक्या रकमेची वाढ करणे आवश्यक आहे. सदरचे काम मुदतीत व प्राधान्याने पूर्ण करणेच्या दृष्टीने प्रत्यक्ष करावयाच्या उर्वरित सर्व कामांचा विचार करून अंदाजपत्रक तयार केलेले असून मूळ प्रशासकीय मान्यतेच्या र.रू.५,००,००,०००/- मर्यादित राहून मुळ निविदा र.रू.१,१९,९२,५६८/- अधिक र.रू.५०,५६,९३१/- वाढ असे एकूण र.रू.१,७०,४९,४९९/- अधिक १८% GST व रॉयल्टी रक्कमेसह एकूण र.रू.२,०१,१८,४०९/- एवढ्या रकमेचे सुधारित अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेकामी तयार केले आहे. त्याचप्रमाणे इकडील विभागाने कामाचे ठेकेदार मे. एस.बी.काळे यांना स्विकृत निविदा दराप्रमाणे (३४.९१% कमी) उर्वरित काम करणेस ते तयार आहेत किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.३०/०८/२०२४ च्या पत्रान्वये निविदा स्विकृत दराप्रमाणे काम करण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुसार मुळ निविदा रक्कमेव्यतिरिक्त |

| | |
|---|---|
| | होणा-या वाढीव र.रू.५०,५६,९३१/- अधिक १८% GST सह र.रू. ५९,६७,१७९/- एवढ्या वाढीव खर्चास मान्यता देणे आवश्यक आहे. तरी उपआयुक्त अग्निशामक विभाग यांनी मागणी केल्यानुसार आवश्यक बाबींचा अंतर्भाव करून अग्निशामक इमारतीच्या नुतनीकरणाच्या कामात मुळ निविदा व्यतिरिक्त होणा-या र.रू.५०,५६,९३१/- अधिक १८%GST सह र.रू.५९,६७,१७९/- एवढ्या वाढीव खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३७२** **विषय क्रमांक- ४३७२**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- माहिती व जनसंपर्क**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३७२ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/३११/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने Sveep कार्यक्रम/ उपक्रम राबविणेबाबतच्या खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.४३७२ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/३११/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, विधानसभा निवडणूक २०२४ साठी महाराष्ट्र राज्यात विविध ठिकाणी विविध वेळी मतदान संपन्न होणार आहे. त्या अनुषंगाने महापालिका कार्यक्षेत्रातील मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या अनुषंगाने Sveep कार्यक्रम/ उपक्रम राबविणे आवश्यक असल्याने मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचे कडील आदेश क्र.निवडणूक/१/कावि/६७७/२०२४, दि.०५/०८/२०२४ अन्वये Sweep विषयक कामकाज करण्यासाठी विविध अधिका-यांची नेमणूक करून याबाबतचे कामकाज सबंधित अधिका-यांवर स्वतंत्रपणे सोपविण्यात आलेले आहे. उपरोक्त नमूद आदेशान्वये उप आयुक्त, माहिती व जनसंपर्क विभाग यांचे कडे महापालिका कार्यक्षेत्रातील मतदानाची टक्केवारी ही राज्याच्या टक्केवारीपेक्षा अधिक करणेचे अनुषंगाने मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे यासाठी विविध नविन व नाविन्यपूर्ण उपक्रम महापालिकेअंतर्गत २०५- चिंचवड, २०६-पिंपरी व २०७-भोसरी या विभानसभा मतदारसंघात राबवून राबविणेत आलेल्या विविध उपक्रमांचा एकत्रित अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, भारत निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडे दैनंदिन स्वरुपात सादर करणेचे कामकाज सोपविण्यात आलेले आहे. उपरोक्त नमूद प्रमाणे मा.अतिरिक्त आयुक्त (२) सो यांचे आदेशान्वये कार्यवाही करणे आवश्यक असल्याने निवडणूक विभागामार्फत Sveep विषयक प्रस्तावित करण्यात आलेले उपक्रम /अभियान वगळून व निवडणूक विभागाशी समन्वय साधून इतर आधुनिक व नाविन्यपूर्ण योजनाचा वापर करून लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी करण्यात आलेल्या उपक्रमाप्रमाणेच विधानसभा निवडणूक २०२४ साठी मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या अनुषंगाने जनजागृती करणेकामी खालीलप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम/ अभियान प्रस्तावित करण्यात आलेला आहे. |

| अ.क्र. | तपशील | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १. | डिजिटल(LED Van) वाहनाचा वापर करून त्याद्वारे मतदान करणेबाबत जनजागृती | र.रु.२,५०,०००/- |
| २. | सायकल Van द्वारे मतदान जनजागृती | र.रु.५०,०००/- |
| ३. | ऑटो रिक्षावर लाऊडस्पिकरद्वारे मतदान जनजागृती | र.रु.३,५०,०००/- |
| ४. | मतदान जनजागृती जाहिरात शहरातील किमान ३०० (मनपा | र.रु.१,५०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | कार्यक्षेत्रातील तीन विधानसभा प्रत्येक १०० या प्रमाणे) रिक्षावर फ्लेक्स, बॅनर्स द्वारे करणे. | |
| ५. | रेडीओ जिंगल्स द्वारे मतदान करणेबाबत जनजागृती | र.रु.१,५०,०००/- |
| ६. | माहितीदर्शक स्टँडीज ,फ्लेक्स , बॅनर्स तयार करणे | मध्यवर्ती भांडार विभागामार्फत |
| ७ | माहितीदर्शक भित्तीपत्रके ,हस्तपत्रिका ,पॅम्पलेटस तयार करणे | मध्यवर्ती भांडार विभागामार्फत |
| ८. | वर्तमान पत्र जाहिरात | प्रत्यक्ष खर्च |
| ९. | पथनाट्यद्वारे मतदान जनजागृती करणे/ फ्लॅशमॉब | र.रु.२,००,०००/- |
| १०. | नाविन्यपूर्ण योजना तसेच ऐनवेळी प्राप्त सूचनांप्रमाणे योजेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत खर्च) बैठकांचे आयोजन, महिला संवाद मेळावा, जनजागृती कामी तातडीने स्टँडीज, फ्लेक्स, बॅनर्स तयार करणे, कार्यक्रमांच्या ठिकाणी फोटोग्राफी, LED Screen व्यवस्था करणे. | र.रु.१,५०,०००/- |
| ११. | मतदान बाबत माहिती देणारी शॉर्ट चित्रफित ग्राफिकच्या माध्यमातून तयार करून सोशल मिडिया, डिजिटल वाहनांद्वारे प्रसारित करणे. | र.रु,२,५०,०००/- |
| १२. | सिने अभिनेते, अभिनेत्री, रील्स स्टार, नामंकित व्यक्ती यांचे मार्फत मतदान जनजागृतीबाबत आव्हानपर मुलाखत /व्हीडीओ तयार करणे | र.रु.१,५०,०००/- |
| १३. | एअर बलून द्वारे मतदान जनजागृती करणे | र.रु.५०,०००/- |
| १४. | शहरातील मॉल, सिनेमागृहे, उद्यान इ. ठिकाणी मिळावे, जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करणे. | र.रु.१,५०,०००/- |
| १५. | डिझाईन, प्रिंटींग आणि पेस्टिंग खर्च | र.रु.५०,०००/- |
| १६. | गृहनिर्माण संस्था फेडरेशन, औद्योगिक संस्था इ. यांचे समवेत मतदान जनजागृती करणेच्या अनुषंगाने बैठक घेणेकामी येणारा खर्च ( सभागृह, नाट्यगृह भाडे ) तसेच इ.खर्च | र.रु.५०,०००/- |
| | एकूण | र.रु.२०,००,०००/- +GST |
| | | (अक्षरी.र.रु. वीस लाख फक्त) |

वरीलप्रमाणे महापालिका कार्यक्षेत्रातील पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभा मतदार संघात सम प्रमाणात सदर खर्च करणे प्रस्तावित आहे. तरी उपरोक्त नमूद प्रमाणे विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने Sveep कार्यक्रम/ उपक्रम राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.२०,००,०००/- (अक्षरी र.रु.वीस लाख फक्त) तसेच येणा-या प्रत्यक्ष खर्चास व सदर उपक्रम/ कार्यक्रम थेट/ कोटेशन पद्धतीने करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३७३** **विषय क्रमांक- ४३७३**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- माहिती व जनसंपर्क**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३७३ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.अति.आयुक्त(३), माहिती व जनसंपर्क यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/३१२/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची प्रसिद्धी करणेबाबतच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.४३७३ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.अति.आयुक्त(३), माहिती व जनसंपर्क यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/३१२/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, महाराष्ट्र शासन मार्फत राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची मनपा कार्यक्षेत्रात प्रभावीपणे प्रसिद्धी करणेबाबत प्राप्त झालेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याने मा.आयुक्त सो यांची दि.०८/०८/२०२४ रोजीच्या प्रस्तावान्वये सदर योजनेची प्रसिद्धी करणेस व येणा-या र.रु.१९,५०,०००/- खर्चास मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची LED Van द्वारे मनपा कार्यक्षेत्रात प्रसिद्धी करणेकामी विभागाकडील मनपा अंदाजपत्रक प्रक्रीयेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे याकामी LED Van विषयक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मे.रामा व्हिजन यांना त्याच र.रु.१६,०००/- + GST प्रतिदिन या दराने उपरोक्त नमूद कामकाज दि.०१/१०/२०२४ पासून दि.१५/१०/२०२४ करणेबाबत पत्र क्र.माजसं/कावि/३/२८१/२०२४ दि.२५/०९/२०२४ अन्वये कळविण्यात आले होते. तसेच सदर LED Van सोबत योजनेची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहचविणेकामी १ निवेदकाची र.रु.५०००/- प्रतिदिन इतक्या मानधनावर नेमणूक करण्यात आली होती. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची प्रसिद्धी करणेकामी एकूण र.रु.३,१५,०००/- इतका खर्च आहे. सदर खर्चाची बिले संबंधित संस्थेस अदा करण्यास व येणा-या खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३७४** **विषय क्रमांक- ४३७४**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- भुमि आणि जिंदगी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३७४ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.भुजि/३/कावि/२८६/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, मौजे चिंचवड येथील सि.स.नं.४७४७ पै, ४७४८ पै, ४७४९ पै भुखंड क्षेत्र ९६.५५ चौ.मी म्हणजेच १०३९ चौ.फुट जागा ५ वर्षे कालावधीकरिता भाडेतत्वावर देणेबाबत. |
| **ठराव क्र.४३७४ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.भुजि/३/कावि/२८६/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, श्री.रेवणसिद्ध राजु शिंदे यांनी दि.०१/०८/२०२४ चे अर्जान्वये मौजे चिंचवड येथील सि.स.नं.४७४७ पै, ४७४८ पै, ४७४९ पै भुखंड क्षेत्र ९६.५५ चौ.मी म्हणजेच १०३९ चौ.फुट जागा स्टार्टअप व्यवसायाकरिता ५ वर्षे कालावधीकरिता भाडेतत्वावर मिळणेकामी विनंती केली आहे. मौजे चिंचवड येथील सि.स.नं.४७४७ पै, ४७४८ पै, ४७४९ पै भुखंड क्षेत्र ९६.५५ चौ.मी म्हणजेच १०३९ चौ.फुट जागा स्टार्टअप व्यवसायाकरिता ५ वर्षे कालावधीकरिता भाडेतत्वावर देणेकामी प्रस्ताव सादर केला असता मा.आयुक्त सो यांनी कायदा विभागाचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करणेकामी निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने कायदा सल्लागार, कायदा विभाग यांना या |

| | |
|---|---|
| | कार्यालयाकडील दि.०५/०९/२०२४ रोजीचे पत्रान्वये मौजे चिंचवड येथील सि.स.नं.४७४७ पै, ४७४८ पै, ४७४९ पै भुखंड क्षेत्र ९६.५५ चौ.मी म्हणजेच १०३९ चौ.फुट जागा स्टार्टअप व्यवसायाकरिता ५ वर्षे कालावधीकरिता श्री.रेवणसिद्ध राजु शिंदे यांना वितरीत करणेकामी कायदा सल्लागार, कायदा विभाग यांनी "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ (ब) व (क) मध्ये महानगरपालिकेच्या मालकीची स्थावर मालमत्ता स्थायी समितीच्या मंजुरीने भाडेपट्ट्याने देणे बाबत तरतुद नमुद असल्याने व मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करता व सदर जागा झोपडपट्टीलगत असल्याने सदर जागेवर अतिक्रमण व घुसखोरी न होणेचे दृष्टीने सदर जागा उपसंचालक नगररचना विभाग निर्धारित करतील त्या दराने श्री.रेवणसिद्ध राजु शिंदे यांना स्टार्टअप व्यवसायाकरिता ५ वर्षे कालावधीकरिता भाडेतत्वावर देणेस हरकत नाही" अशा स्वरूपाचा अभिप्राय कळविला आहे. उपसंचालक नगररचना व विकास विभाग यांना मौजे चिंचवड येथील सि.स.नं.४७४७ पै, ४७४८ पै, ४७४९ पै भुखंड क्षेत्र ९६.५५ चौ.मी म्हणजेच १०३९ चौ.फुट जागेचे ५ वर्षे कालावधीकरीताचे भाडेदर निर्धारित करून मिळणेकामी कळविले असता त्यांनी त्यांचे दि.०३/१०/२०२४ रोजीचे पत्रान्वये सदर जागेसाठी ५ वर्षे कालावधीकरिता एकरकमी र.रु.४५१.०० प्रति चौ.फुट भाडेदर कळविला आहे. त्याअनुषंगाने, मौजे चिंचवड येथील सि.स.नं.४७४७ पै, ४७४८ पै, ४७४९ पै भुखंड क्षेत्र ९६.५५ चौ.मी म्हणजेच १०३९ चौ.फुट जागा श्री.रेवणसिद्ध राजु शिंदे यांना उपसंचालक नगररचना व विकास विभाग यांनी ५ वर्षे कालावधीकरिता निर्धारित केलेल्या दराने म्हणजेच र.रु.४५१.०० या दराने ५ वर्षे कालावधीकरिता येणारे भाडे र.रु.४,६८,५८९/- आणि त्यावरील १८% G.S.T. र.रु.८४,३४६/- असे एकुण र.रु.५,५२,९३५/- (मनपा व शासन कराव्यतिरिक्त) मनपा कोषागारात जमा करून सदर जागा श्री.रेवणसिद्ध राजु शिंदे यांना ५ वर्षे कालावधीकरिता देणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३७५** **विषय क्रमांक- ४३७५**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- स्थापत्य प्रकल्प**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३७५ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/२०९२/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महापालिका शहरी हद्दीतील वाहतूक कोंडी कमी करणेकरीता सल्लागार नेमणुक करणेबाबत.(भाग-२) |
| **ठराव क्र.४३७५ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/२०९२/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील अनेक चौकांमध्ये वाहतुक कोंडी बाबत जटील प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यावर उपाययोजना करणेच्या दृष्टीने रस्ता सुरक्षा परीक्षण करुन रस्ते वाहतुक कोंडी मुक्त करणेकरीता आराखडा तयार करणे, सदरचे काम चालु असताना त्यावर नियंत्रण ठेवणे व काम पुर्ण झालेनंतर १ वर्षापर्यंत पुर्नवलोकन करून अहवाल सादर करणेकरीता वाहतुक सल्लागार नेमणुक करणेकामी QCBS पध्दतीने बंद पाकीटाद्वारे दर पत्रक मागविणेत आलेले आहे. सदर कोटेशन नोटीस नुसार दरपत्रकाची बंद पाकीटे स्विकारण्याची मुदत दि.०३/१०/२०२४ ते दि.१०/१०/२०२४ दु.३.०० वा. पर्यंत होती. सदर कालावधी मध्ये एकुण ३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत. QCBS पद्धतीने मे.स्ट्रीट सर्ज टेक्नोलॉजी प्रा.लि. यांना सर्वाधिक एकत्रित गुण म्हणजेच |

| | |
|---|---|
| | ८९.५० इतके गुण प्राप्त झाले आहे. सदर प्राप्त दराबाबत QCBS पध्दतीने सर्वाधिक गुण प्राप्त झालेले वाहतुक सल्लागार म्हणजेच मे.स्ट्रीट सर्ज टेक्नोलॉजी प्रा.लि. यांना दर कमी करणेकामी दि.१०/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले आहे. त्यास अनुसरुन सदर वाहतुक सल्लागार यांचे कडुन दि.११/१०/२०२४ रोजी सुधारीत दर र.रु.३,९०,०००/- प्रति ठिकाण इतका प्राप्त झाला आहे. तरी विषयांकित कामासाठी वाहतुक सल्लागार मे.स्ट्रीट सर्ज टेक्नोलॉजी प्रा.लि. यांना र.रु.३,९०,०००/- प्रति ठिकाण (जीएसटी वगळुन) इतक्या दराने नेमणुक करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३७६** **विषय क्रमांक- ४३७६**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- स्थापत्य प्रकल्प**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३७६ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/२०९३/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महापालिका शहरी हद्दीतील वाहतूक कोंडी कमी करणेकरीता सल्लागार नेमणुक करणेबाबत.(भाग-१) |
| **ठराव क्र.४३७६ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/२०९३/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील अनेक चौकांमध्ये वाहतुक कोंडी बाबत जटील प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यावर उपाययोजना करणेच्या दृष्टीने रस्ता सुरक्षा परीक्षण करुन रस्ते वाहतुक कोंडी मुक्त करणेकरीता आराखडा तयार करणे, सदरचे काम चालु असताना त्यावर नियंत्रण ठेवणे व काम पुर्ण झालेनंतर १ वर्षापर्यंत पुर्नवलोकन करून अहवाल सादर करणेकरीता वाहतुक सल्लागार नेमणुक करणेकामी QCBS पध्दतीने बंद पाकीटाद्वारे दर पत्रक मागविणेत आलेले आहे. सदर कोटेशन नोटीस नुसार दरपत्रकाची बंद पाकीटे स्विकारण्याची मुदत दि.०३/१०/२०२४ ते दि.१०/१०/२०२४ दु.३.०० वा. पर्यंत होती. सदर कालावधी मध्ये एकुण ३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत. QCBS पद्धतीने मे.ग्लोबल ट्राफिक सोल्युशन यांना सर्वाधिक एकत्रित गुण म्हणजेच ८९.५० इतके गुण प्राप्त झाले आहे. सदर प्राप्त दराबाबत QCBS पध्दतीने सर्वाधिक गुण प्राप्त झालेले वाहतुक सल्लागार म्हणजेच मे.ग्लोबल ट्राफिक सोल्युशन यांना दर कमी करणेकामी दि.१०/१०/२०२४ रोजी च्या पत्रान्वये कळविणेत आले आहे. त्यास अनुसरुन सदर वाहतुक सल्लागार यांचे कडुन दि.११/१०/२०२४ रोजी सुधारीत दर र.रु.३,९०,०००/- प्रति ठिकाण इतका प्राप्त झाला आहे. तरी विषयांकित कामासाठी वाहतुक सल्लागार मे.ग्लोबल ट्राफिक सोल्युशन यांना र.रु.३,९०,०००/- प्रति ठिकाण (जीएसटी वगळुन) इतक्या दराने नेमणुक करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३७७** **विषय क्रमांक- ४३७७**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- प्राथमिक शिक्षण**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३७७ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.शिक्षण/०५/कावि/४०४/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका विदयालयातील "शिष्यवृत्तीधारक" विदयार्थ्यांना भारतदर्शन यात्रेकरीता येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.४३७७ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.शिक्षण/०५/कावि/४०४/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील राज्य शिष्यवृत्ती परिक्षा, NMMS (National Means Cum-Merit Scholarship) परिक्षा व सारथी शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये जिल्हा/राज्य स्तरावर गुणवत्ता प्राप्त एकूण २३ विदयार्थ्यांना भारतीय संस्कृतीचा ऐतिहासिक वारसा, भौगोलिक ज्ञान, वैज्ञानिक जिज्ञासा वाढावी व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणेची संधी मिळावी व त्याचा अनुभव विदयार्थ्यांना आपल्या शैक्षणिक वापरात तसेच भविष्यात व्हावा व सदर भारतदर्शन यात्रेचा आनंद विदयार्थ्यांना घेता यावा व विदयार्थ्यांची दमछाक न होता त्यांनी ही भारतदर्शन यात्रा उत्साहाने व आनंदाने साजरी करावी याकरीता "एक विशेष बाब" म्हणून विदयार्थ्यांचा जाणे-येणेकरीताचा प्रवास मागील वर्षीप्रमाणे विमानाने असावा अशा सूचना मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या आहेत. भारतदर्शन यात्रेचा कालावधी दि. ०२ डिसेंबर २०२४ ते दि. ०८ डिसेंबर २०२४ असून याकरिता मनपा संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करून अंदाजित खर्च मागविला असता लघुत्तम दर मे.हवाई ट्रॅव्हल्स, पुणे यांचे लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. मे.हवाई ट्रॅव्हल्स, पुणे यांच्या लघुत्तम दराने दौरा आयोजित केल्यास रक्कम रूपये १४,२१,१९६/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. मे.हवाई ट्रॅव्हल्स, पुणे यांना आगाऊ रक्कम पोटी ८० टक्के रक्कम र.रू.११,३६,९५६/- अदा करणेस व दौरा पूर्ण झालेनंतर होणा-या प्रत्यक्ष कमी अथवा जास्त खर्चास करारनामा न करता सदरच्या विषयास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३७८** **विषय क्रमांक- ४३७८**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- विद्युत मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३७८ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), विद्युत मुख्य यांचेकडील पत्र क्र.विमुका/०८/कावि/३३४/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, ग. दि. माडगूळकर नाट्यगृहातील येथील लिफ्टची तीन वर्षाकरीता चालन व देखभाल दुरुस्ती करणेबाबत. |
| **ठराव क्र.४३७८ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), विद्युत मुख्य यांचेकडील पत्र क्र.विमुका/०८/कावि/३३४/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.03-29/2024-2025 अन्वये ग. दि. माडगूळकर नाट्यगृहातील येथील लिफ्टची तीन वर्षाकरीता चालन व देखभाल दुरुस्ती करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरीलप्रमाणे निविदा नोटीस क्र.03-29/2024-2025 साठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.रिअल इलेक्ट्रीकल्स या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या निविदा र.रु.27,65,000/- पेक्षा 23.40% कमी दराने आलेली निविदा असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याने तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत |

| | |
|---|---|
| | मा.अति.आयुक्तसो यांनी दि.14/10/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.21,17,990/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णयः | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३७९** **विषय क्रमांक- ४३७९**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- माहिती व जनसंपर्क**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३७९ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.माजसं/०४/कावि/१२/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, महर्षी वाल्मिकी विचार प्रबोधन जयंती दिनाबाबत. |
| **ठराव क्र.४३७९ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.माजसं/०४/कावि/१२/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने दरवर्षी प्रमाणे महर्षी वाल्मिकी विचार प्रबोधन पर्वाचे गुरूवार, दि. १७/१०/२०२४ रोजी आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार विविध कार्यक्रमाचे आयोजन तसेच विविध उपक्रम (खेळ पैठणीचा महिला सफाई कर्मचा-यांसाठी खास कार्यक्रम मानधन - र.रू.४०,०००/-, उत्कृष्ट काम करणा-या सफाई कर्मचा-यांचा सत्कार करणेकामी प्रशस्तीपत्र खर्च – र.रू.६,०००/-, हिंदी/मराठी जुन्या नवीन गाण्यांचा कार्यक्रम मानधन – र.रू.५५,०००/-, चहापान खर्च, गुणवंत विद्यार्थी सत्कार, फ्लेक्स खर्च इ. – र.रू.९०,०००/-) राबविण्यासाठी अंदाजे एकूण र.रू.१,९१,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख एक्याण्णव हजार फक्त) या अपेक्षीत खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णयः | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३८०** **विषय क्रमांक- ४३८०**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- पाणीपुरवठा**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३८० दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पापु/कावि/२०४/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, चिखली व मोशी येथे पाण्याची मुख्य नलिका टाकणे व ३ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे व कार्यान्वित करणे"(पॅकेज-२) चे कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.४३८० दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.पापु/कावि/२०४/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, चिखली व मोशी येथे पाण्याची मुख्य नलिका टाकणे व ३ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे व कार्यान्वित करणे"(पॅकेज-२) चे काम मे.अरिहंत कन्स्ट्रक्शन हे ठेकेदार करीत असून त्यांना |

निविदा क्र.१३/२-१/२०२०-२१नुसार दि.१४/०६/२०२१अन्वये कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. सदर कामामध्ये पाण्याची मुख्य नलिका टाकणे व ३ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे व कार्यान्वित करणेचा समावेश आहे. तसेच ५०० मिमी, ६०० मिमी, ७०० मिमी, ८०० मिमी. व १२५० मिमी.व्यासाच्या एकूण १२००० मी. लांबीच्या जलवाहिनी टाकणेच्या कामाचा समावेश आहे. सदर कामाची निविदा र.रु.५९.४३ कोटी इतकी असून आत्तापर्यंत या निविदेंतर्गत र.रु.५३.३६ कोटींची देयके अदा करण्यात आलेली आहेत. प्रकल्प पूर्ण करणेसाठी एकूण र.रु.२.२५ कोटी इतक्या वाढीव निधीची आवश्यकता आहे. सध्याच्या कामाची प्रगती खालीलप्रमाणे आहे-

१)१२५० मिमी व्यासाची MS पाईपलाईन- एकूण ६३७८ मीटर्स पैकी ६२०० मीटर्सचे काम पूर्ण.

सदरची पाईप लाईन देहू- आळंदी रस्त्याच्या दुभाजकालगत टाकावी लागत आहे त्यामुळे रस्ते खोदाई, ट्रॅफिक परवानगी, diversions,जलनि:सारण व पावसाळी वाहिन्या, गॅस लाईन्स, विद्युत वाहिन्या ई. गोष्टींची काळजी घेऊन प्रस्तावित जलवाहिनी टाकताना अनेक अडथळे आले. सदराचा रस्ता हा खूपच रहदारीचा असल्यामुळे रस्ता सतत चालू ठेवावा लागतो. तसेच १२५० मिमी पाईपलाईनला आतून लाईनींग करण्याकरिता एकूण र.रू.१.३०कोटी वाढीव खर्च झाला.

२) वाढीव inlet/ outlet पाईपलाईन

सदर कामांतर्गत पाण्याच्याटाकीची जागा स्थलांतरित करून पर्यायी जागेत उभारण्यात आली. त्यामुळे inlet/outlet पाईपलाईन टाकण्यासाठी वाढीव ५००,६०० मिमी व्यासाची १.२ किमी लांबीची पाईपलाईन टाकण्यात आली त्यामुळे वाढीव खर्च झाला.

३)चिखली जलशुद्धीकरण केंद्रापासून देहू आळंदी रस्त्यापर्यंत १२५० मिमी व्यासाची MS पाईपलाईन टाकणे-

सदर निविदेअंतर्गत चिखली जलशुद्धीकरण केंद्रापासून देहू आळंदी रस्त्यापर्यंत २२०० मीटर्स पाईपलाईन टाकणेत आली. सदरचा रस्ता खूपच अरुंद व अडीअडचणीचा होता व सोबतच विविध विभागाच्या ब-याच सेवावाहीन्या असल्यामुळे पाईपलाईन जास्त खोलीवर टाकणेत आली. त्यामुळे खोदाईचे परिमाणात वाढ झाली आहे. शिवाय, चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाईपलाईन टाकणेसाठी दोन्ही बाजूस अशुद्ध पाण्याची पाईपलाईन तसेच १४०० मिमी व्यासाची जलवाहिनी तसेच पावसाळी वाहिन्या, गॅस लाईन्स, विद्युत वाहिन्या ई. अडथळे असल्यामुळे जलशुद्धीकरण केंद्राच्या मागच्या बाजूने पाईपलाईन टाकणेत आली. त्यामुळे जलवाहिनीची टाकावयाची लांबीमध्ये वाढ होऊन अतिरिक्त खर्चात वाढ झाली.

४) देहू आळंदी मुख्य रस्त्यावरील चौक व culvert क्रॉसिंग करणे –

देहू आळंदी मुख्य रस्त्यावर १२५० मिमी व ८०० मिमी व्यासाची पाइपलाईन टाकताना कुदळवाडी, रीवरचौक, भारतमाता चौक , Y जंक्शन ई. एकूण अनेक ठिकाणी चौक व culvert क्रॉसिंग करण्यात आले. त्यामुळे पाईप लाईन टाकताना जास्त खोदाई करावी लागली तसेच अनेक ठिकाणी गरजेनुसार concrete encasing करण्यात आहे त्यामुळे सदर खर्चात वाढ झाली.

सदर प्रकल्पांतर्गत एकूण १०००० मी. लांबीच्या जलवाहिन्यांचे काम देहू-आळंदी रस्ता येथे प्रस्तावित होते. परंतु सदर काम करत असताना जलनि:सारण, स्टॉर्म, गॅस, विद्युत वाहिन्या ठराविक अंतरावर क्रॉसिंग असल्याने प्रस्तावित जलवाहिनी टाकताना अनेक अडथळे आले. त्यामुळे सदर जलवाहिन्यांचे खोदकाम निविदेतील अटी-शर्तीपेक्षा अधिक करावे लागले. तसेच, देहू-आळंदी पालखी सोहळा, मा.पंतप्रधान यांचा देहू येथील नियोजित दौरा यामुळे सदर ठिकाणी

| | |
|---|---|
| | टाकणेत आलेल्या पाईपलाईन वरील रस्ता दुरुस्तीचे काम प्रशासकीय सूचनेनुसार पुन:श्च करावे लागले. त्यामुळे सदर प्रकल्प खर्चात मूळ निविदा रक्कमेपेक्षा वाढ होत आहे. सदर निविदेतील कामांचा उद्देश हा "चिखली येथील जलशुध्दीकरण केंद्राचे पाणी च-होली, वडमुखवाडी, डुडुळगाव, मोशी, बो-हाडेवाडी इ. भागास पुरेशा दाबाने पुरविणे" असून प्रकल्प पूर्ण झाल्यास सदर भागास पुरेसे पाणी उपलब्ध होईल. त्यानुषंगाने निविदेमधील १२५० मिमी. व्यासाचे १७० मी. राष्ट्रीय महामार्ग क्रॉसिंगचे काम, कुदळवाडी येथील ६० मी. नाला क्रॉसिंगचे काम, पाण्याच्या टाकीचे ५०० मिमी. व ६०० मिमी. व्यासाचे २४० मी. लांबीचे काम व त्यासंबंधित असणारी हायड्रो टेस्टींग, रस्ता पुर्ववत करणे, काँक्रीटीकरण करणे इ. शिल्लक कामे पूर्ण करणे गरजेचे असून सदरील कामे पूर्ण करण्यासाठी र.रु.२.२५ कोटी इतक्या वाढीव निधीची आवश्यकता आहे. तरी, वरील कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु.५९.४३ कोटी इतकी असून वाढीवर.रु.२.२५ कोटी सह एकूण र.रु.६१.६८ कोटी इतकी होत आहे. त्यामुळे सदर काम हे ५.४०% कमी असून निविदा अटी व शर्तीनुसार (Escalation भाव वाढ, GST १८% इत्यादी) र.रु २२.२९ कोटी सह एकूण र.रु.८३.९७ कोटी खर्च होत आहे. सदर कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेतील वाढीव खर्चाचे रक्कमेवर व त्यामुळे अंतर्गत बाबींवर दि.२९/०६/२०२२ चे शासन निर्णयानुसार असणारी अप्रत्यक्षित/ असाधारण भाववाढ फरक देय राहणार नाही. तरी त्यासाठी एकूण र.रु.८३.९७ कोटी या सुधारीत खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ४३८१** **विषय क्रमांक- ४३८१**

**दिनांक – १४/१०/२०२४** **विभाग- स्वच्छ महाराष्ट्र/ भारत अभियान नागरी प्रकल्प अंमलबजावणी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.४३८१ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्वभाअक/२/कावि/१४७/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, शासनाकडून विविध मंजुर प्रकल्पांचे अनुषंगाने Appointment of a PMU for Strategic Support for Implementation of Swachh Bharat Mission Program, AMRUT and Majhi Vasundhra Abhiyan या कामकाजासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करणेबाबत. |
| **ठराव क्र.४३८१ दिनांक - १४/१०/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्वभाअक/२/कावि/१४७/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, केंद्र शासनाने जाहीर केलेले अमृत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण, स्वच्छ भारत अभियानाचे व राज्य शासनाचे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून कार्यान्वित माझी वसुंधरा अभियान अंतर्गत सद्यस्थितीत कार्यान्वित असलेले प्रकल्पांचे कामकाज सन २०२६ अखेर पर्यंत सुरु राहणार आहे. उक्त नमुद सर्व अभियानाचे अनुषंगाने वेळचेवेळी साप्ताहिक, मासिक व त्रैमासिक अहवाल शासनास सादर करणे, तसेच सदर अभियानाचे अनुषंगाने सभा घेऊन त्याचा सभावृत्तांत तयार करणे, तसेच प्रकल्पांचे अनुषंगाने शासनाशी समन्वय साधणेकरीता पत्रव्यवहार करणे, तसेच प्रकल्पाचे शासन अनुदानाचे हिस्स्याची रक्कम मिळणेकामी पाठपुरावा करणे, तसेच शासन मागणी करेल त्याप्रमाणे प्रकल्पांचे अनुषंगिक माहिती शासनास विहीत कालावधीत सादर करणे, इ. विविध कामकाजाची आवश्यकता व निकड पाहता तांत्रिक सल्ल्यासाठी सल्लागार संस्थेकडील सल्लागारांची शासन निर्णय क्र. GAD-IT 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), दि.५ ऑक्टोबर २०२३ नुसार २४ महिने कालावधीसाठी नियुक्ती करणेकामी प्रस्तावित करणेत येत आहे. |

| अ क्र | पद | सल्लागार श्रेणी (शासन निर्णय - DIT GR dt. 05-Oct-2023) | दरमहा दर र.रु. (शासन निर्णय - DIT GR dt. 05-Oct-2023) | पदांची संख्या | कालावधी महिने | एकुण र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Team Leader cum IT Expert | Senior Consultant | ३,८५,०००/- | १ | २४ | ९२,४०,०००/- |
| २ | SWM Expert | Consultant | ३,४५,०००/- | १ | २४ | ८२,८०,०००/- |
| ३ | SBM MIS Expert | Consultant | ३,४५,०००/- | १ | २४ | ८२,८०,०००/- |
| ४ | Majhi Vasundhara Expert | Consultant | ३,४५,०००/- | १ | २४ | ८२,८०,०००/- |
| ५ | IEC/Social Media/CB Expert | Associate Consultant | २,८५,०००/- | १ | २४ | ६८,४०,०००/- |
| ६ | Wash Expert | Associate Consultant | २,८५,०००/- | १ | २४ | ६८,४०,०००/- |
| - | | | प्रति महा र.रू. १९,९०,०००/- | - | एकुण | ४,७७,६०,०००/- |

वरीलप्रमाणे शासनाकडून विविध मंजुर प्रकल्पांचे अनुषंगाने Appointment of a PMU for Strategic Support for Implementation of Swachh Bharat Mission Program, AMRUT and Majhi Vasundhra Abhiyan या कामकाजासाठी २४ महिने कालावधीसाठी एकुण र.रु.४,७७,६०,०००/- (अक्षरी र.रु.चार कोटी सत्याहत्तर लाख साठ हजार फक्त) एवढा खर्च येणार असून सदरचा खर्च आरोग्य मुख्य कार्यालयाकडील “आरोग्य विषयक कन्सलटन्सी सर्व्हिसेस (सल्लागार फी)” या लेखाशीर्षामधून अदा करणेत येईल. मा.आयुक्त सो यांनी M/s.KPMG Advisory Services Pvt Ltd या संस्थेचे कामकाजाचे सादरीकरण पाहून शासन निर्णय क्र. GAD-IT 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), दि.५ ऑक्टोबर २०२३ नुसार M/s.KPMG Advisory Services Pvt Ltd या संस्थेस शासनाकडून विविध मंजुर प्रकल्पांचे अनुषंगाने Appointment of a PMU for Strategic Support for Implementation of Swachh Bharat Mission Program, AMRUT and Majhi Vasundhra Abhiyan या कामकाजासाठी २४ महिने कालावधीसाठी थेट पद्धतीने नियुक्ती देणेस व याकरिता र.रू.४,७७,६०,०००/- इतक्या खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**सही/-**
(चंद्रकांत पोपट इंदलकर)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.